# सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## कार्यशाळा विभाग, मिरज
## जाहिर निविदा सुचना क्र.०५/२०२०-२१

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, कार्यशाळा विभाग मिरज कार्यालयाकडुन खाली नमूद केले कामासाठी दोन लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. सदरच्या निविदा प्रभाग स.क्र.४ मिरज बारनिशी मध्ये स्विकारल्या जातील.

| अ.क्र. | कामाचे नांवे | अंदाजीत रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. | सुरक्षा अनामत र.रु. | कामाची मुदत दिवस | निविदा पत्रक किंमत र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मनपा तपशीलपत्रकानुसार सक्शन व्हॅन MH-१० P-१०१९ चे केबीन, टँकर, शो व इलेक्ट्रीक दुरुस्ती व संपुर्ण वाहनाचे रंगकाम करणे. | २,६९,८००/- | २७००/- | मंजूर निविदा दराच्या ५% | ४५ | २००/- |

**टिप :-**

१. वरील कामासाठी बयाणा रक्कम अंदाजे रक्कमेच्या १ टक्का व सुरक्षा अनामत मंजूर निविदा दराच्या ५ टक्के राहिल.

२. सदर कामासाठी बयाणा रक्कम युनियन बँक ऑफ इंडिया मनपा खाते क्र.४२४२०२०१०५०२७०८ या खातेवर भरणेचे आहे.

३. सदर कामासाठी निविदा फॉर्म फि ही निविदा प्रसिध्द झाले तारखे पासून दि.२८/०९/२०२० प्र.स.क्र.०४ मधील यांत्रिकी विभाग मिरज या कार्यालया मध्ये भरणा करणेची आहे. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म निविदा प्रसिध्द झाले पासून दि. २८/०९/२०२० पर्यंत यांत्रिकी विभाग मिरज येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म फी भरणा केलेली पावती सादर केलेनंतर देणेत येतील.

४. सदर कामाचे निबिदा फॉर्म मिरज येथील प्र.स.क्र.०४ मधील यांत्रिकी विभागात दि.२९/०९/२०२० रोजी सायं ५.०० वाजे पर्यंत मागविणेत येत आहेत.

५. वरील कामा करिता लिफाफा क्र.०१ मध्ये मक्तेदाराने व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, कामाचे दाखले, बयाणा चलन जोडणे आवश्यक आहे. व लिफाफा क्र.०२ मध्ये निविदा फॉर्मवर स्वहस्ताक्षरात निविदा दर देणेचा आहे.

६. प्राप्त झालेल्या निविदा दि. ३०/०९/२०२० रोजी दुपारी १२.०० वा. उघडणेत येतील त्यावेळी इच्छुक मक्तेदारानी उपस्थित रहावे.

७. कोणतीही एक निविदा स्विकारने अथवा नाकारणे याबाबतचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे.

(स्वाक्षरी)
उपायुक्त
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर मनपा.
मनपा/मि/काशावि-१/ ९२ /-२०२०-२१
दिनांक :- १८/०९/२०२०

# सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.

## कार्यशाळा विभाग, मिरज

## निविदा, शर्ती व अटी

निविदा दोन लिफाफा पध्दतीने देणेचे आहे. (लिफाफ्यावर कामगिरीचे नांव व लिफाफा क्रमांक स्पष्ट करावा)

**लिफाफा क्र.१ मध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे देणेचे आहेत.**

अ) बयाणा रक्कमेचे चलन युनियन बँक ऑफ इंडिया खाते नं. ४२४२०२०१०५०२७०८ मध्येभरणा करून त्याची प्रत जोडणेची आहे.

ब) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (व्यवसायकर/शॉपअॅक्ट प्रमाणपत्र)

क) कामाचा अनुभवाचा दाखला

वरील प्रमाणपत्रांच्या प्रती सक्षम अधिकाऱ्यांच्या साक्षांकित असणे आवश्यक आहे.

**लिफाफा क्रं.२ मध्ये फक्त दर भरलेली निविदा असावी.**

१. लिफाफा क्रं.१ मध्ये (कागदपत्रे) प्रथम उघडणेत येईल. लिफाफा क्रं.१ मध्ये किमान तीन निविदाधारक पात्र झाले तरच लिफाफा क्र.२ (टेंडरदर) उघडणेत येईल.

२. निविदा फॉर्म मध्ये दिलेल्या सविस्तर वर्णन व तपशील प्रमाणे सदरची कामगिरी खालील दिलेल्या अटीवर महापालिके स करून देणेची आहे.

३. निविदा फॉर्म पूर्ण भरण्याचा असून त्यात कोणताही जादा मजकूर शर्ती अगर अटी घालण्याच्या नाहीत.

४. निविदा दर महापालिकेने दिलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे असले पाहिजेत.

५. पुरविण्यात / वापरण्यात येणाऱ्या मटेरियलच्या प्रकारानुसार त्याचे दर रूपयांत अंकी व अक्षरी दोन्ही नमूद केलेले असले पाहिजेत.

६. निविदा दर त्यासाठी राखून ठेवलेल्या रकान्यात सुस्पष्ट परिमाणवार आणि खुलासेवर नमूद करण्याचा आहे.

७. निविदा दर हा ठेकेदारास द्यावे लागणारे वगैरे सर्व करादरासह देण्याचा आहे.

८. निविदा भरताना खाडाखोड केली असल्यास तेथे निविदा भरणाऱ्यांने सुवाच्च स्वाक्षरी केली असली पाहिजे.

९. ज्यांची निविदा मंजूर होणार नाही, त्यांनी भरलेली बयाणा रक्कम निविदा मंजुरीच्या अखेर निर्णयानंतर परत करण्यात येईल. ज्यांची निविदा मंजूर होईल त्यांनी सुरक्षा अनामत भरून रितसर लेखी करारपत्र करून द्यावे लागेल. त्यानंतर बयाणा रक्कम परत केली जाईल.

१०. यात दिलेले निविदा दर किमान ९० दिवस निविदा धारकांवर बंधनकारक राहतील.

११. निविदा मंजुरीच्या निर्णयानंतर सदर कामगिरी वरील दराने करून देण्याची लेखी समज निविदा धारकांस देणेत येईल.

१२. ज्यांची निविदा मंजूर होईल त्यांनी सदर कामाची समज मिळाल्यानंतर, (अ) निविदा मंजूर दराप्रमाणे होणाऱ्या एकूण किंमतीचे शेकडा ५ टक्के दराने रक्कम सुरक्षा अनामत म्हणून महापालिकेत रोखीने भरण्याचे आहेत.(ब) योग्य किंमतीचे मुद्रांकावर स्वखर्चाने लेखी करारपत्र करून देणेचे आहे.

१३. करारपत्र पूर्ततेच्या हमीसाठी कंत्राटदारास लायक जामीन देण्यास सांगण्याचा अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

१४.वरीलप्रमाणे पूर्तता केली नाही तर बयाणा रक्कम या महापालिकेस आलेल्या व येणाऱ्या नुकसानीच्या व खर्चाच्या भरपाईपोटी अंशत: वसुली म्हणून जमा करून घेण्यात येईल व सदर कामगीरीसाठी महापालिकेस पुन्हा कराव्या लागणाऱ्या खटाटोपांमुळे जो प्रत्यक्ष जादा खर्च येईल तो व विलंब लागून गैरसोय सहन करावी लागेल आणि जर भाववाढ झाली तर त्यामुळे जादा किंमत मोजावी लागेल त्या नुकसानीच्या खर्चाची भरपाई ज्याची निविदा मंजूर होईल त्यांचे जाती इस्टेटवर राहिल.

१५. उपरोक्त अट क्र. १२ नुसार करारपत्र व सुरक्षा ठेवीची पूर्तता झालेनंतर सदर कामाची वर्क ऑर्डर देण्यात येईल.

१६. वरीलप्रमाणे वर्कऑर्डर व वाहन हस्तांतर केलेपासून दिलेल्या मुदतीत मक्तेदाराने सदरची कामगिरी पूर्ण करणेची आहे. अन्यथा दंडाची आकारणी खालील प्रमाणे केली जाईल.

१. रूपये ३,०००/- पर्यंत दर दिवसास रूपये ५/-(पाच)

२. रूपये ३,००१/- ते १०,०००/- पर्यत दर दिवसास रूपये १०/- (दहा)

३. रूपये १०,००१/- ते २५,०००/- पर्यत दर दिवसास रूपये ३०/- (तीस)

४. रूपये २५,००१/- ते १,००,०००/- पर्यत दर दिवसास रूपये ५०/- (पन्नास)

५. रूपये १ लाख ते ५ लाख पर्यत दर दिवसास रूपये ३००/- (ती◌ाशे)

६. रूपये ५ लाख पेक्षा अधिक रक्कमेच्या कामास दर दिवसास रूपये ५००/-(पाचशे) प्रमाणे दंडाची रक्कम बिलातून वसूल करणेत येईल.

१७.सदरची कामगीरी पुर्ण केल्यापासून ६ महिन्यामध्ये केले कामाबाबत काही तक्रार उद्भवलेस त्याबाबत लेखी तक्रार कंत्राटदारास दिली जाईल, त्या तक्रारीचे निराकरण पंधरा दिवसांचे आत करणेची जबाबदारी कंत्राटदारांवर राहील.

१८.सदरची कामगिरी ही महापालिकेच्या स्पेसिफिकेशनप्रमाणे झाली नसेल तर नाकारण्याचा हक्क महापालिकेस राहील.

१९.ज्या निविदादाराची निविदा मंजूर झाली आहे त्यास कोणत्याही कारणास्तव निविदा मागे घेता येणार नाही.

२०.कोणतीही निविदा मंजूर / नामंजूर करण्याचा अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

उपरोक्त नमूद शर्ती, अटी मी पूर्णपणे वाचल्या असून त्या मला मान्य आहेत व त्यानुसारच मी ही निविदा भरीत आहे.

**मक्तेदाराची सही व शिक्का**

# सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**कामाचे नाव :-** सक्शन व्हॅन MH-१० P-१०१९ चे केबीन, टँकर, शो व इलेक्ट्रीक दुरुस्ती काम व संपुर्ण वाहनाचे रंगकाम करणे कामाचे तपशिलपत्रक.

| अ.क्र. | दुरूस्ती कामाचा तपशील | प्रमाणक |
|---|---|---|
| १. | **शो दुरुस्ती** -संपुर्ण केबीन व शो खोलुन हायड्रॉच्या सहाय्याने खाली उतरवून शो चे फौंडेशन पेटया, तळपत्रा, सर्पोट पेटया, अँगल इत्यादी गंजून सडलेल्या ठिकाणी इलेक्ट्रीक वेल्डींग करुन पॅचवर्क करणे. डाव्या बाजूचे फुटरेस्ट १८ गेज एम.एस. पत्रा वापरुन नविन करणे पुढील काच रबर गोट मधुन सोडवून काचेची काठाळी पॅचवर्क करणे व नविन रबर गोट वापरुन काच रिफिटींग करणे. शो चे दोन्ही डोम नविन करणे. पुढील डाव्या बाजूचा शो पीस नविन बसविणे. दोन्ही बाजुचे फायबर मडगार्ड कव्हर नविन बसविणे. केबीनचा तळपत्रा पॅचवर्क करणे. बॉनेट मधील पेटया सडलेल्या ठिकाणी पॅचवर्क करणे, केबीन फौंडेशन नविन बसविणे. समोरील बंपर नविन फिटींग करणे. व हायड्रॉच्या सहाय्याने शो रिफिटींग करणे चेसिस वर | जॉब |
| २. | **संपूर्ण लाकडी केबीन नविन** -संपूर्ण जूने लाकडी केबीन खोलुन बाजूला काढणे व नविन केबीन खालील प्रमाणे मटेरीयल वापरुन तयार करणे<br>साईड पटटया, दरवाजे सागवान व टप (हडंग) आळाशी<br>पाठीमागील बॅक व केबीन दळी बाबळ<br>टपावरील फळया व पेटया बोर्ड आंबा<br>केबीनच्या आतील पेटया आंबा<br>केबीन टपावर व बॅकला जीआय पत्रा<br>केबीन च्या बँकला ३" सी चॅनल सपोर्टला मजबूत फिटींग करणे चेस वर नविन वाक्या घालुन भक्कम करणे.<br>केबीनला लागणारे संपूर्ण वायशर, नटबोल्ट व सर्पोट साठी लागणारे अँगल इत्यादींसह. | जॉब |
| ३. | **सक्शन टँक** - टँक फौंडेशन मधुन सोडवून पुढील बाजूने २" टँकर वर उचलुन मजबूत पॅकिंग करुन देणे. टँकरच्या आतील सडलेला पार्टिशन पत्रा काढुन नविन पत्रा फिटींग करणे. मागील चाकावरील मडगार्ड ३ mm पत्रा व हेवी अँगल वापरुन नविन तयार करुन फिटींग करणे. | जॉब |
| ४. | **कलर काम**-संपूर्ण वाहनास चेसिस, केबीन, शो, डिस्क, टँकरची बाहेरील बाजू वगैरे सह घासकाम करुन साफ सफाई करुन लांबी अस्तर करुन इकडिल पसंतीनुरुप दोन हात सिंथेटिक एनॅमल पेंट वापरुन सुबक रंगकाम करणे, टँकरला आतील बाजूस दोन हात इपॉक्सी कलर वापरुन कलर काम करणे, संपूर्ण वाहनाचे नंबर प्लेट, लेटरिंग करणे. | जॉब |
| ५ | **वायरींग काम**-वाहनाचे जुने खराब झालेले वायरिंग काढून संपूर्ण वायरिंग नवीन जूने करुन फिटींग करणे, हेड लॅम्प असेंब्ली २ नग, टेल लॅम्प असेंब्ली २ नग, इंडिकेटर असेंब्ली २ नग, टपावरील पार्किंग लाईट, वायपर आर्म ब्लेड, टि हॉर्न तसेच आवश्यक बल्ब वगैरे साहित्य नवीन फिटींग करुन लाईटींग सिस्टीम चालू करणे. | जॉब |
| ६. | **अॅक्सेसरीज**- दोन्ही बाजूस हॅन्डल व दोन्ही साईड फुल साईज ब्रॅकेट व आरसे फिटींग करणे शो वरील मोनोग्राम चारी चाकावरील रबर मॅट फिटींग करणे. | जॉब |
| ७. | **सिट कुशनींग काम**-ड्रायव्हर व क्लिनर सिटस चे क्वायर, स्पंज, युफोम, भोर रेग्झीन नवीन वापरुन सिट कुशनींग काम करणे. | जॉब |
| ८. | **ब्रेक दुरुस्ती**-मागील चाकाचे एअर लिकेज बंद करणे. ब्रेक लायनिंग बदलणे. ब्रेक सेटींग करणे. कॉम्प्रेसर किट बदलुन हॅन्ड ब्रेक हॅन्डल बदलुन हॅन्ड ब्रेक | जॉब |

| | | |
|---|---|---|
| | नविन घालणे. आवश्यक ठिकाणी इंजिन पॅकिंग घालुन ऑईल लिकेज बंद करणे. | |
| ९. | **पासींग**-संपुर्ण वाहनास आर.टि.ओ. नियमानुसार रेडियम, रिफलेक्टर्स लावणे. लेटरिंग व नंबरिंग करणे. आर.टी.ओ. नियमानुसार स्पिड गर्व्हनर किट बसविणे. वाहन पासींग करणे. | जॉब |
| १०. | **साईड गार्ड**-वाहनाचे दोन्ही बाजूला हेवी एम.एस. स्क्वेअर पाईप ३" वापरुन साईड गार्ड तयार करुन फिटींग करणे. मागील बाजूला ४" सी चॅनल पाईप वापरुन गार्ड तयार करणे व फिटींग करणे. | जॉब |